सन २०१७-१८ साठी, कृषि उन्नती योजना - एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान अंतर्गत, राष्ट्रीय फलोत्पादन अभियानासाठी केंद्र व राज्य हिश्याची रक्कम वितरीत करण्याबाबत. (सर्वसाधारण प्रवर्ग)

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांक : राफअ २०१७/प्र.क्र.११९ /९अे,
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक:- १७ नोव्हेंबर, २०१७.

वाचा :-१) शासन निर्णय कृषि,पशुसंवर्धन,दुग्ध विकास व मत्स्य व्यवसाय विभाग क्र.राफअ २०१७/प्र.क्र.११५ /९ अे, दि. १९ जून २०१७.
२) केंद्र शासनाच्या कृषि , सहकार व शेतकरी कल्याण विभागाचे पत्र क्र.F.No.१८-२४/ २०१७-MIDH, दि.७.११.२०१७,

प्रस्तावना-

राज्यात सन २००५-०६ या आर्थिक वर्षापासून केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय फलोत्पादन अभियान राबविण्यात येत आहे. सन २०१४-१५ पासून सदर योजना एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानातंर्गत समाविष्ट करण्यात आलेली आहे. सदर अभियान सन २०१७-१८ मध्ये केंद्र हिस्सा ६० % व राज्य हिस्सा ४०% या प्रमाणे राबविण्यात येत आहे.

कृषि उन्नती योजना- एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान अंतर्गत, राष्ट्रीय फलोत्पादन अभियान राज्यात राबविण्यासाठी केंद्र शासनाच्या संदर्भ क्र.२ येथील पत्रान्वये, केंद्र हिश्याचा दुसऱ्या हप्त्याचा, सर्वसाधारण प्रवर्गासाठी रू.३५००.०० लाख निधी राज्य शासनास वितरीत केला आहे. त्यानुसार राज्य हिश्याचा ४०% निधी रू.२३३३.०० लाख होत आहे. सदरचा केंद्र व राज्य हिश्याचा निधी, राष्ट्रीय फलोत्पादन अभियानाच्या अंमलबजावणीकरीता व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळ, पुणे यांना वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

शासन निर्णय-

१. एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत सर्वसाधारण प्रवर्गाच्या केंद्र हिश्याकरीता रु.९३९४.०९ लाख व राज्य हिश्याकरीता रु.६२६२.७३ लाख तरतूद, सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पामध्ये करण्यात आलेली आहे. केंद्र शासनाच्या कृषि, सहकार व शेतकरी कल्याण विभागाच्या दि.०७.११.२०१७ च्या पत्रान्वये, एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत, राष्ट्रीय फलोत्पादन अभियान राबविण्यासाठी सर्वसाधारण प्रवर्गाकरीता रू.३५००.०० लाख निधी वितरित

केला आहे. त्यानुसार राज्य हिश्याचा ४०% निधी रू.२३३३.०० लाख इतका होत आहे. सदरचा केंद्र व राज्य हिश्याचा एकूण निधी, रू. ५८३३.०० लाख, मंजूर अर्थसंकल्पित तरतूदीमधून, कृषि उन्नती योजना-एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान अंतर्गत, राष्ट्रीय फलोत्पादन अभियान राबविण्यासाठी, सर्वसाधारण प्रवर्गाकरीता खर्च करण्यास शासनाची वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर खर्च खालील लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

१) मागणी क्रमांक डी - ३
मुख्य लेखाशिर्ष-२४०१ - पीक संवर्धन,
(००) (१९९) - बागायती व भाजीपाला पिके,
(०३) - रोप मळे
(०३) (३७) कृषि उन्नती योजना- एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान
(केंद्र हिस्सा ६० %) **(सर्वसाधारण)**
(२४०१९५६३)
३३-अर्थसहाय्य

२) मागणी क्रमांक डी - ३
मुख्य लेखाशिर्ष-२४०१ - पीक संवर्धन,
(००) (१९९) - बागायती व भाजीपाला पिके,
(०३) - रोप मळे
(०३) (३४) कृषि उन्नती योजना- एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान
(राज्य हिस्सा ४० %) **(सर्वसाधारण)**
(२४०१४५०७)
३३-अर्थसहाय्य

३. या योजनेसाठी मंजूर केलेला निधी खर्च करण्यास लेखा अधिकारी, महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळ, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळ, पुणे यांना संनियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. या योजनेंतर्गत लाभ घेणा-या लाभार्थ्यांची निवड पारदर्शकपणे करण्यात यावी. लाभार्थ्यांची यादी संपूर्ण तपशीलासह कृषि विभागाच्या अधिकृत संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.

५. या शासन निर्णयान्वये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या निधीचा तात्काळ विनियोग DBT द्वारे करण्यात यावा. तसचे निधी विनियोगाच्या अनुषंगाने व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळ, पुणे यांनी वेळोवेळी उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर करावे.

६. वरील प्रमाणे मंजूर केलेला निधी अर्थसंकल्पिय तरतुदीच्या मर्यादेत व मासिक निधी विवरण पत्राप्रमाणे वित्त विभागाने विकसीत केलेल्या "संगणकीय अर्थसंकल्प वितरण प्रणाली" मध्ये शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध आहे. शासन निर्णयाची काटेकोरपणे अमंलबजावणी होईल याची दक्षता आहरण व संवितरण अधिकारी यांनी घ्यावी. या योजनेसाठी खर्च करताना सर्व वित्तीय नियम, विनियम, वित्तीय शासन निर्णय, अधिसूचना, आदेश, केंद्र शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश, केंद्रीय दक्षता आयोगाच्या मार्गदर्शक सूचना आणि भारताचे नियत्रंक व महालेखापरिक्षक यांचे या संदर्भातील निरिक्षण आणि खर्चात अनियमतता होणार नाही यांचे पालन होईल या अटीच्या अधिन राहून निधी खर्च करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

७. प्रस्तुत आदेश शासन परिपत्रक वित्त विभाग, क्रमांक: अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.१८.०४.२०१७ मधील अटींची पुर्तता करण्याच्या अधीन राहून, त्याअन्वये प्रशासकीय विभागास प्रदान केलेल्या अधिकारामध्ये निर्गमित करण्यात येत आहेत.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१७१११८१३३५३३०३०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Kamlakar Yeshvant Vanjare

Digitally signed by Kamlakar Yeshvant Vanjare
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=AGRICULTURE AND ADF DEPT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c08eef62183520696d2005b153b8cc2a552337a23fc4d457a4434216d9324c3b, serialNumber=6fd0ddfb9412fda09432e5f8a3e140c065770ba4ca63ef6fc5ba354810e2828b, cn=Kamlakar Yeshvant Vanjare
Date: 2017.11.18 13:38:51 +05'30'

(क.य. वंजारे)

उप सचिव, महाराष्ट्र शासन,

प्रति,

१. मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई -३२.
२. मा.मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई -३२.
३. मा.राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई -३२.
४. मा.विधानसभा/विधानपरिषद, सदस्य, विधानमंडळ सचिवालय,मुंबई/नागपूर.
५. प्रधान सचिव (कृषि) यांचे स्वीय सहाय्यक,मंत्रालय, मुंबई -३२.
६. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय, विभाग,मंत्रालय, मुंबई-३२
७. आयुक्त कृषी, महाराष्ट्र राज्य,पुणे.
८. संचालक (फलोत्पादन), कृषी आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे.

९. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळ, पुणे.
१०. सर्व संचालक/ सर्व सहसंचालक कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,पुणे.
११. सर्व विभागीय कृषी सहसंचालक.
१२. सर्व जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी.
१३. सहाय्यक संचालक (लेखा) कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१४. महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता) (लेखा परीक्षा) मुंबई /नागपूर.
१५. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
१६. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
१७. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
१८. संचालक लेखा व कोषागार अधिकारी, मुंबई
१९. सहसंचालक लेखा व कोषागारे संगणक कक्ष, नवीन प्रशासन भवन, ५वा मजला, मुंबई -३.
२०. लेखा अधिकारी, महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळ, पुणे
२१. माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई-३२.
२२. निवड नस्ती.